# जाहिर नोटीस

तमाम जनतेस सदरील जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **भुसंपादन प्रसताव क्रं. १९/२०२३ मौजे उमाळे व मौजे चिंचोली ता.जळगांव** येथील जमिनधारकांच्या जमीनी मा. राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे नावे **अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालय,जळगांव** यांना महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्रं.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ नुसार व शासन परिपत्रक क्रं.एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्रं.१२/अ-२, दि. २५.जानेवारी २०१७ मधील निर्देशानुसार मौजे **मौजे उमाळे व मौजे चिंचोली ता.जळगांव** येथील **खाजगी जमीनी राष्ट्रीय महामार्ग ७५३-F चिंचोली गावाचे गट क्रं. २०१ पासून ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालया पर्यन्त जाण्याकरिता ३० मीटर रुंद रस्त्याच्या कामासाठी संपादन या प्रयोजनाकरिता** थेट खरेदीने संपादन करुन दयावयाच्या आहेत.

सदरची भूसंपादनाची कार्यवाही करण्यासाठी म.जिल्हाधिकारी जळगांव यांनी उप विभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांना प्राधिकृत केलेने त्यांचेकडे भुसंपादनाची कार्यवाहीसाठी प्रस्ताव सुरु आहे. **"भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण , पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३" मधील तरतुदी विचारात घेवून** योग्य ती कार्यवाही करण्याकामी या जाहिर नोटीसीव्दारे सुचित करण्यात येते की, संबंधित खरेदी करावयाच्या जमिनीच्या जमीन मालकांचे नांव व गट नंबर आणि अंदाजीत संपादन क्षेत्र इ.तपशिल दिलेला आहे. खालील जमिनीबाबत जमीन मालकांच्या हिश्यावर हक्क , हितसबंध, दत्तक, वारस हक्क , गहाण, दान , बोजा, बाकी , भाडेपट्टा , कर्ज , बक्षीस पत्र, जप्ती, करारदार व इतर कोणाचाही हक्क असल्यास सदरची **नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दहा दिवसांच्या आंत** सबळ पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त **अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालय,जळगांव** यांचे कार्यालयामध्ये किंवा उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव , जिल्हाधिकारी जळगांव कार्यालयाचे आवारात यांचे कार्यालयामध्ये समक्ष दाखल करावी.

उपरोक्त मुदतीमध्ये जर कोणीही हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप हरकत दाखल केली नाही तर कोणाचेही काही एक म्हणणे किंवा हरकत नाही असे समजून सदर मिळकतीचा खरेदीखतांचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणा-या हरकती सदरील कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही. सदर जमीन मालकांची मिळकत निर्बंध व बिना जोखमीची असल्याचे समजून हे कार्यालय मा. राज्यपाल,महाराष्ट्र शासन यांच्या वतीने खरेदी व्यवहार केव्हीही पुर्ण करेल व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मौजे उमाळे व मौजे चिंचोली ता.जळगांव येथील संपादनात येवू शकणा-या जमीनींच्या तपशिलाचा तक्ता**

| अ.क्रं. | कब्जेदार शेतकरी चे नांव | गट क्रं. /सर्व्हे क्रं. | भुधारणा पध्दती | ७/१२ नुसार एकूण क्षेत्र (हे.आर) | | | | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ला.ला. | पोख | एकूण | आकार | ला.ला. | पोख | एकूण |
| १ | **गाव उमाळे** | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | दिलीपकुमार हिराचंद जैन समाधान गिरधर साळुंखे, लताबाई समाधान साळुंख | **२३** | जी-वर्ग-१ | ११.४६५ | ४.९३५ | **१६.४०** | १५.५८ | ०.४० | ०.०० | **०.४०** |
| २ | मोईज मन्सुरअली राजकोटवाल | **२४** | जी-वर्ग-१ | १.३० | २.०३ | **३.३३** | २.१९ | ०.३२ | ०.१० | **०.४२** |
| ३ | जयंतीलाल स्वरुपचंद जैन ,रविंद्र स्वरुपचंद जैन,अरुण स्वरुपचंद जैन, विजय स्वरुपचंद जैन | **२५** | जी-वर्ग-१ | ३.३६ | ४.१६ | **७.५२** | ५.६९ | ०.१० | ०.०० | **०.१०** |
| ४ | कल्पना रमाकांत पाटील, उषाबाई सुरेश चव्हाण | **२९** | निसप्र-वर्ग-२ | ०.५७ | ०.४८ | **१.०५** | २.०५ | ०.२० | ०.०९ | **०.२९** |
| ५ | प्रमोद जगन्नाथ पाटील | **३१** | जी-वर्ग-१ | ५.०२ | ०.३७ | **५.३९** | २५.२५ | ०.१४ | ०.१० | **०.२४** |
| ६ | हेमचंद चैनरुपचंद भंडारी | **३२/१** | जी-वर्ग-१ | १.९३ | ०.०० | **१.९३** | ८.६९ | ०.१५ | ०.०० | **०.१५** |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | चिरायु कॉटन इंडस्ट्रीज गारखेडा शिवार ता.धरणगाव भागीदार संस्था तर्फे पल्केश व्दारकाप्रसाद अग्रवाल,चिरायू कॉटन इंडस्ट्रीज गारखेडा शिवार ता.धरणगांव भागीदार संस्था तर्फे भागीदार वल्लभ सुभाष अग्रवाल, चिरायू कॉटन इंडस्ट्रीज गारखेडा शिवार ता.धरणगाव भागीदार संस्था तर्फे भागीदार कुशल श्याम मंगल , चिरायू कॉटन इंडस्ट्रीज गारखेडा शिवार ता.धरणगाव भागीदारी संस्था तर्फे भागीदार चिरायू हरीश अग्रवाल. | **३२/२** | जी-वर्ग-१ | १.८९ | ०.३४ | **२.२३** | ८.५१ | ०.३२ | ०.२० | **०.५२** |
| ८ | सुदेश अनंतराय शाह | **३२/३/१** | जी-वर्ग-१ | १.६० | ०.८० | **२.४०** | ७.२० | ०.२२ | ०.२५ | **०.४७** |
| ९ | दिलीप पंडीत भांडारकर, निलेश दिलीप भांडारकर | **३२/३/२** | जी-वर्ग-१ | १.३७ | ०.६५ | **२.०२** | ६.१७ | ०.२८ | ०.३० | **०.५८** |
| | **एकूण** | | | **२८.५०५** | **१३.७६५** | **४२.२७०** | | **२.१३** | **१.०४** | **३.१७** |
| | **गाव चिंचोली** | | | | | | | | | |
| १० | प्रमोद जगन्नाथ पाटील | **२०१** | जि-वर्ग-१ | १.५७ | ०.१९ | **१.७६** | ९.१२ | ०.४० | ०.०१ | **०.४१** |
| ११ | सिमा प्रमोद पाटील | **२०६** | जि-वर्ग-१ | ३.४९ | ०.०८ | **३.५७** | १९.६९ | ०.५० | ०.०२ | **०.५२** |
| १२ | मैनाबाई नारायण जाधव वगैरे | **२०७/अ** | निसप्र-वर्ग-२ | २.३८ | १.२९ | **३.६७** | ६.६२ | ०.३० | ०.०४ | **०.३४** |
| १३ | भगवान विश्राम पाटील | **२०७/क/१/१** | निसप्र-वर्ग-२ | ३.३८ | १.४८ | **४.८६** | ९.९६ | ०.४० | ०.०२ | **०.४२** |
| १४ | दर्शनलाल नैभदास वालेचा | **२०७/१/१/२** | जि-वर्ग-१ | १.६९ | ०.७३ | **२.४२** | ४.९९ | ०.२२ | ०.०४ | **०.२६** |
| १५ | गकजान माणिकराव भोईटे | **२०७/क/२** | जि-वर्ग-१ | १.६८ | ०.७३ | **२.४१** | ४.९९ | ०.१२ | ०.०३ | **०.१५** |
| १६ | कल्पना संभाजीराव देशमुख, भुषण रघुनाथ सानप,राहूल अनिल सानम | **२०७/ब/१** | जि-वर्ग-१ | २.१८ | १.०१ | **३.१९** | ६.६२ | ०.३२ | ०.०० | **०.३२** |
| १७ | विकास बुधाजी लाड ,सुरेश बुधाजी लाड ,पंकज राजेंद्र लाड संगीता राजेंद्र लाड, एकता आकेश वंजारी | **२०७/ब/२** | जि-वर्ग-१ | २.१८ | १.०१ | **३.१९** | ६.६३ | ०.४८ | ०.०५ | **०.५३** |
| | **एकूण** | | | **१८.५५** | **६.५२** | **२५.०७** | | **२.७४** | **०.२१** | **२.९५** |
| | **एकूण एकंदर उमाळे+चिंचोली** | | | **४७.०५५** | **२०.२८५** | **६७.३४०** | | **४.८७** | **१.२५** | **६.१२** |

**टिप:- वरिल गटापैकी संपादीत होणारे क्षेत्र खरेदीचे वेळी कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.**

**दिनांक** १२/०२/२०२६

ठिकाण – जळगांव

**(गिरीष ठाकूर)**
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय**
**व शासकीय रुग्णालय,जळगांव**

**(सुरेंद्र काबरा)**
**जिल्हा सरकारी वकील,**
**जळगांव**

SUB DIVISIONAL OFFICER
JALGAON TALUKA JALGAON
सत्यमेव जयते

**(महेश सुधळकर)**
**भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी**
**जळगांव भाग जळगांव**